स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा परिषद नंदुरबार, महिला व बाल विकास विभाग**
**नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टोकर तलाव रोड, नंदुरबार ४२५४१२**

E-mail : icdszpndb@gmail.com
दुरध्वनी क्रमांक ०२५६४-२१०२२७

वाचा:-१)महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शा.निक्र.एस.आर.व्हि/१०९५/प्र.क्र.१/९५ मुंबई दि.०८जून १९९५
२)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन१९९९/प्र.क्र.२/९९/सेवा३ मुंबई ३२ दि.२० जुलै २००१
३)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.१/सेवा३/ मंत्रालय मुंबई ३२ दि.१५ ऑक्टोबर २००९
४)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ मंत्रालय मुंबई ३२ दि.०१ एप्रिल २०१०
५)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन११०९/प्र.क्र.१/सेवा३/मंत्रालय मुंबई ३२ दि.२१ मे २०१०
६)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा ३ मंत्रालय मुंबई ३२ दि.०५ जुलै २०१०
७)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन११०९/प्र.क्र.४१/सेवा ३ मंत्रालय मुंबई ३२ दि.०१ जुलै २०११
८)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा ३ मंत्रालय मुंबई ३२ दि.०१ जानेवारी २०१९
९)महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा ३ मंत्रालय मुंबई ३२ दि.०२ मार्च २०१९
१०)महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शा.नि.क्र.डिएसआर-२०१९/प्र.क्र.१६/आस्था-०५ मंत्रालय मुंबई दि.०६/०३/२०१९
११)महाराष्ट्र शासन ग्रमाविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण ५०२१/प्र.क्र.१६४/आस्था-१०/२५ मुंबई दि.२८ एप्रिल २०२२
१२)जिल्हा पदोन्नती समिती सभा दिनांक ०७/०१/२०२५
१३)कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक १३/०२/२०२५

जाक्र.जिपनं/मबावि/आस्था-१/सुसेआप्रयो/१०५/२०२५ नंदुरबार दिनांक १३/०२/२०२५

**<u>आदेश</u>**

गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचा-यांना पदोन्नतीची कुंठीतता घालविण्याकरिता उपरोक्त शासन निर्णयान्वये आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे.त्यानुसार महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क.३/२०१९/सेवा-३/मंत्रालय,मुंबई दिनांक ०२ मार्च २०१९,संदर्भ क्र.०९अन्वये दिनांक ०१/०१/२०१६ पासून ती लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वसित पग्रती योजना अमलात आणण्यांत आली आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.संकिर्ण ५०२१/प्र.क्र.११६४/आस्था १० मुंबई दि.२८ एप्रिल २०२२ वाचा मधील संदर्भ क्र.११ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (भाग चार-अ) मधील क्रमांक मविसे१०/२०११/प्र.क्र.७०/आस्था-३अ दिनांक ०९/०१/२०२४ ची अधिसूचना तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (भाग चार-अ) मधील मविसे.१०१६/प्र.क्र.१९/२०१६ आस्था-३ दिनांक १८/०९/२०१८च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र विकास सेवा गट ब व मध्ये पदोन्नतीसाठी जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (समाजकल्याण) या संवर्गामध्ये (५% आरक्षित) अंगणवाडी पयवेक्षिका यांना देखील पदोन्नतीची तरतुद असल्याने अंगणवाडी पर्यवेक्षिकांना सातव्या वेतन आयोगामधील तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वित्त विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयांतील तरतूदीनुसार त्यांना उपलब्ध असलेल्या पदोन्नतीच्या पदाच्या वेतन श्रेणीचा लाभ त्यांचे पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यांत आला आहे.

त्याअनुषंगाने दिनांक ०९/०१/२०२३ रोजी वाचा मधील संदर्भ क्र.१२ अन्वये जिल्हा पदोन्नती समितीने मान्यता दिलेनुसार खालील नमुद पर्यवेक्षिका वर्ग-३ कर्मचा-यांना तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनांतर्गत ३० वर्षे सेवेनंतरचा तीसरा लाभ पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी **एस-२३-६७७००-२०८७००** या वेतन श्रेणीत रकाना क्र.०६ मध्ये नमुद दिनांकापासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यांत येत आहे.

| अ क्र | पर्यवेक्षिकेचे नाव | से.नि वेळीचा कार्यरत प्रकल्प | २४ वर्ष सलग सेवेनंतर दुसरा लाभ मंजूर दिनांक | शा.नि.दि.०२/०३/२०१९ नुसार ३० वर्षे सेवा अथवा २४ वर्षाचा दुसरा लाभ +६ वर्षे सेवा पुर्ण झाल्याचा दिनांक | सुधारित सेवांतर्गत आश्वासित पग्रती योजनेचा तीसरा लाभ मंजूर दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंदनबाई सिताराम साळवे | तळोदा | २२/०६/१९८७ | २१/०६/२०१७ | २१/०६/२०१७ |
| २ | मिनाक्षी रुपसिंग वळवी | तोरणमाळ | ०१/०७/१९८७ | ३०/०६/२०१७ | ३०/०६/२०१७ |
| ३ | कमल रुबजी गावीत (नाईक) | नंदुरबार | २३/०६/१९८७ | २०/०६/२०१७ | २०/०६/२०१७ |
| ४ | वृंदा अविनाश गावीत | अक्कलकुवा | २४/१०/१९८३ | ०१/०१/२०१६ | ०१/०१/२०१६ |
| ५ | विमल ज्ञानेश्वर चौधरी | रनाळा | २९/१२/१९८३ | ०१/०१/२०१६ | ०१/०१/२०१६ |
| ६ | दमयंती अमित वसावे | नंदुरबार | १३/०६/१९८३ | ०१/०१/२०१६ | ०१/०१/२०१६ |
| ७ | सविता जत्रु गावीत | रनाळा | २६/१०/१९८३ | ०१/०१/२०१६ | ०१/०१/२०१६ |

**<u>अटी व शर्ती:-</u>**

१)आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागु केल्याची खात्री करावी.दुसरा लाभ लागु केला असल्यास तीसरा लाभ लागु करावा.पहिला लाभ मंजूर लाभ लागु न करता एकस्तर वेतनश्रेणी घेत असल्यास अतिप्रदान रकमेची वसुली करण्यात यावी.

२)ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक दि.२८ एप्रिल २०२२ व या कार्यालयाचे पत्र क्र.जिपनं/मबावि/आस्था-१/२०२२ नंदुरबार दि.१५/०९/२०२२ अन्वये दुस-या लाभाची फेर वेतन निश्चिती करून मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नंदुरबार यांचे कडून फेर वेतन निश्चिती पडताळणी केल्याची खात्री करण्यात यावी.

३)ही पदोन्नती नसून या वेतनश्रेणीत त्यांना पदोन्नतीप्रमाण वेतननिश्चीतीचा लाभ देण्यात येईल.मात्र वेतननिश्चितीत मिळालेला लाभ त्या पदावर कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

४)सदर पर्यवेक्षिकांना पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळाली तरी त्यांचे नाव पर्यवेक्षिका या संवर्गाच्या जेष्ठता सुचीतच योग्य त्या क्रमांकावर राहील.

५)सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळाल्यानंतर नियमित पदोन्नती झाल्यास सदर कर्मचारी पदोन्नतीच्या ठिकाणी हजर न झाल्यास अथवा नियमित पदोन्नती नाकारल्यास त्याचा उपरोक्त लाभ काढून घेयात येईल.

६)उपरोक्त कर्मचा-यांना सदर लाभ लागु करण्यापुर्वी सेवा पुस्तकांची पडताळणी करून सदर आदेशान्वये दिलेला लाभ दुस-यांदा दिला जात नसल्याबाबत खात्री करावी.

७)कर्मचा-यांस विशेष वेतन मिळत असेल तर;योजनेखालील पदोन्नतीनंतर कर्मचा-यांस मुळ वेतनश्रेणीत विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

८)सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनचा लाभ मंजूर करतांना पदोन्नतीनंतर कर्मचा-यांस मुळ वेतनश्रेणीत विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

९)उपरोक्त कर्मचारी एकस्तर वेतन घेत असल्यास या आदेश नुसार वेतन निश्चीत केल्यावर एकस्तर वेतनश्रेणी व सुधारित लाभाची वेतन श्रेणी यातील अतिप्रदान रक्कम सुधारित लाभ लागु होईल त्या महिन्यापासून १०. समान हप्त्यांत त्यांचे वेतनातून वसूल करावी.

१०)उपरोक्त आश्वासित पग्रती योजनेच्या दुस-या लाभाची वेतन निश्चतीची मुख्य लेखा व वित्त अधिकारी,वित्त विभाग जिल्हा परिषद नंदुरबार यांचे कार्यालयाकडून वेतन निश्चीतीची पडताळणी करण्यात यावी व तदनंतरच लाभ लागू करण्यात यावा.वरील प्रमाणे लाभ लागु करतांना लाभ मंजूरीचा कालावधीत एकस्तर वेतनश्रेणी घेतल्यामुळे सुधारित वेतनश्रेणी लागू करतांना अतिप्रदान असल्यास वसुली करण्यात यावी.

११)संबंधित कर्मचा-याविरुध्द खाते/विभागीय/न्यायालीन चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबत प्रकल्प कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.परंतु संबधीत कर्मचा-या विरूध्द चौकशी प्रस्तावित /प्रलंबीत असल्यांचे मुळ सेवा पुस्तक अथवा वैयक्तीक नस्तीनुसार दिसून येत असल्यांस सदरचा लाभ लागू करण्यांत येऊ नये व सदरची बाब तात्काळ या कार्यालयास कळवावी.

१२)उपरोक्त कर्मचा-यांच्या सलग ३० वर्षाच्या सेवा कालावधीत चौकशी अंती अकार्यदिन घोषित केला असेल किंवा अन्य करणास्तव सेवा खंडीत केली असल्यास सदर लाभ तेवढया कालावधीसाठी पुढे ढकल्यात यावा.याबाबत संबंधीत कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकावरून पडताळणी करण्यात यावी.

१३)सदर आदेशानंतर संबधीत कर्मचा-यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

१४)संबधीत कर्मचा-यांकडून अतिप्रदाने वचनपत्र भरून घेण्यात येऊन मुळ सेवा पुस्तकांस जोडण्यात यावे.

१५) सदर आदेशातील कर्मचा-यांना सुधारित आश्वासीत प्रगती योजनेचा तीसरा लाभ लागु करतांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नंदुरबार यांच्या कार्यालयाकडून वेतन निश्चीतीची पडताळणी करून तदनंतरच लाभ लागू करण्यात यावा.तसेच संबधीतांचे वेतन ज्या लेखाशिर्षामध्ये अदा करणेत येईल त्यांच लेखाशिर्षका खाली सुधारित वेतनाचा खर्च टाकण्यात यावा.

१६) वरील प्रमाणे लाभ लागू करत असतांना संबधीत कर्मचारी विहीत कालावधीत सेवा प्रवेश परिक्षा उत्तीर्ण न झाल्याने वेतनवाढी स्थगीत करण्यात आल्या असतील अथवा सदर पदासाठीची एखादी अर्हता पुर्ण करीत नसल्याने अथवा चौकशी अंती शिक्षेस आदेश पारित करण्यात येऊन वेतनवाढ रोखणे (कायम/तात्पुरती)किंवा निम्नस्तर आणणे इ.शिक्षा झाली असल्यांस सदर आदेशाची उचीत अंमलबजावणी करयात यावी.यासाठी संबधीत कर्मचा-यांचे वेतन फरकाचे विवरणपत्र,वेतननिश्चीती आदेश,वेतन निश्चीती आदेश नोंद मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नंदुरबार यांचेकडून तपासून वेतनांत लागू करतेवेळी पंचायत समिती स्तरावर संबधीत सहाय्यक लेखाधिकारी व गट विकास अधिकारी यांचेकडून तपासणी करून घेण्यात यावी.अन्यथा अतिप्रदान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रा.)यांची राहिल.

१७)सदर आदेशाची नोंद संबधीत कर्मचारी यांचे मुळ सेवा पुस्तकांत घेण्यात यावी.

सावन कुमार(भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नंदुरबार**

प्रति,
------------------------------संबधीतास
द्वारा बालविकास प्रकल्प अधिकारी ,ए.बा.वि.से.यो.-----------जि.नंदुरबार
प्रत माहितीसाठी
१)मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नंदुरबार
२)उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद,नंदुरबार
३)जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाकवि) जिल्हा परिषद,नंदुरबार
प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी
बालविकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से.यो.प्रकल्प ----------------जि.नंदुरबार